# बृहन्मुंबई महानगरपालिका

## लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय, शिव – 22

क्र. एलटीएच/19783/रुप्र.
दिनांक : 30/09/2024

## जाहिरातीचा नमुना

लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व वैद्यकिय महाविद्यालय यांच्या आस्थापनेवर नसलेल्या खालील नमुद रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने (प्रत्येक 90 दिवसांच्या कालावधीनंतर 1 दिवसाचा खंड देवून) 6 महिन्याकरिता भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज जाहिराती सोबत जोडले असुन त्याची Print अर्जदाराने घ्यावी.

सदर पदासाठी रुपये 710/- + 18% जीएसटी रु. 128/- = एकूण रु. 838/- इतके शुल्क लो.टि.म.स. रुग्णालयाच्या रोखपाल विभागात दि. 01.10.2024 ते दि. 11.10.2024 पर्यंत कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत भरून, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि. 11.10.2024 पर्यंत सादर करावा.
(दूरध्वनी क्रं. 022-24076381/ 24063000).

खालील नमुद केलेल्या अर्हता व अटींची पुर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

| अनु. क्र. | पदाचे नाव | एकुण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1 | न्युरोलॉजी तंत्रज्ञ | 01 | रु. 20,000/- | 1. उमेदवाराने बी.पी.एम.टी (Bachelor in Paramedical Technology in Neurology) महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठामार्फत चालविला जाणारा न्युरॉलॉजी विषयातील हा पूर्णवेळ 3 वर्षाचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने 12 महिन्यांची इंटरशीप पुर्ण केलेली असावी. |
| 2 | ऑप्टोमेट्रीस्ट | 01 | रु. 25,000/- | 1. उमेदवार हा शालान्त (एस.एस.सी.) परीक्षेसह ऑप्टोमेट्रीमधील 3 वर्षाचा पदविकाधारक असावा<br>किंवा<br>उच्च माध्यामिक शालान्त (एच.एस.सी.) परीक्षेसह बी.एस्सी. ऑप्टोमेट्रीमधील पदवीधारक असावा. पदवीधारक उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| | | | | |

वयाची अट : दि. 11.10.2024 पर्यंत वय १८ वर्षांपेक्षा कमी व ३८ वर्षांपेक्षा अधिक नसावे आणि मागासवर्गीयांकरीता 43 वर्षांपेक्षा अधिक नसावे.

1. सदर नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी तत्वावर असेल.
2. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांची सेवा आवश्यकता नसेल त्यावेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.
3. अपूर्ण असलेले अर्ज आणि विहित प्रपत्रामध्ये नसलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
4. अर्जावर स्वत:चे अद्ययावत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र स्वत:च्या स्वाक्षरीसह चिटकविण्यात यावे.
5. उमेदवाराने अर्हतेबाबत नोंद घ्यावी. उमेदवार अर्हता व शर्ती पूर्ण करीत नसल्यास व नियुक्त केले गेल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची सेवा त्वरीत खंडीत करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
6. स्वत:चा पोस्टाचा पत्ता पिनकोड क्रमांकासहित पूर्ण असावा आणि मोबाईल नंबर, ई-मेल आयडीसह पूर्ण नमूद करण्यात यावा.
7. उमेदवारास मराठी लिहिता, वाचता व बोलता आले पाहिजे.
8. उमेदवाराने शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक दाखले, माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षेच्या गुणपत्रिका अर्जासोबत जोडाव्यात.
9. विवाहित महिलांनी त्यांचा विवाहाचा दाखाला, गॅझेटची प्रत, नाव बदलल्याचा दाखला इ. अर्जासोबत जोडावे.
10. उमेदवाराने पदवी परीक्षा एकापेक्षा जास्त प्रयत्नांत उत्तीर्ण केली असल्यास ती परीक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण केली याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
11. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयात नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
12. निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
13. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियुक्तीचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
14. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
15. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
16. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये 500/- च्या बंधपत्रावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.
17. निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून नेमणुकीनंतर एक महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक राहील.
18. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

19. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 30 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
20. कंत्राटी न्युरोलॉजी तंत्रज्ञ व ऑप्टोमेट्रीस्ट यांना ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
21. निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीनंतर प्रत्येक तीन महिन्यानंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्यात येईल.
22. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागाच्या ठिकाणी किंवा वेळोवेळी वरिष्ठांच्या आदेशानुसार कामकाजाच्या तीनही पाळयांमध्ये काम करावे लागेल.
23. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा अनुज्ञेय असेल, त्या व्यतिरिक्त कंत्राटी कर्मचा-यांना लागू असणा-या प्रचलित नियमानुसार नैमितिक रजा अनुज्ञेय असतील.
24. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
25. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निंवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.
26. निवड झालेल्या उमेदवाराने दररोज त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार बायोमेट्रीक करतील व नियमाने हजेरी पटावर स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल. त्यांची विना परवानगी गैरहजेरी विना वेतनी गैरहजेरी करण्यात येईल.

विशेष सूचना –

अ) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ब) सविस्तर सूचना, याबाबतच्या अटी व शर्ती, मनपाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात आल्या आहेत. उमेदवारांनी त्याचे बारकाईने अवलोकन करुन संकेतस्थळावर प्रसारीत केलेल्या अर्जाच्या तसेच वैयक्तीक माहितीपत्राच्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जाचे विहित शुल्क भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.

क) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

सही/-
30.08.2024
श्री. दामोदर जाधव
कार्यकारी प्रशासक (प्रमुख रुग्णालये)
लो.टि.म.स. रुग्णालय, शीव

सही/-
30.08.2024
(डॉ. मोहन जोशी)
अधिष्ठाता
लो.टि.म.स. रुग्णालय, शीव

बृहन्मुंबई महानगरपालिका
लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022
दूरध्वनी क्रं. - 02224066381-89/

## अर्जाचा नमुना

पदाचे नाव: ____________________

प्रति,
अधिष्ठाता,
लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व
सर्वसाधारण रूग्णालय, शीव,
मुंबई – 400022.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022 मध्ये _______________ पदाकरिता दिनांक ________________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे. माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे :

1) (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :

______________________________________________________________________

2) पत्ता (कायमचा) :

______________________________________________________________________

______________________________________________________________________

3) पत्ता (पत्रव्यवहाराचा) :

______________________________________________________________________

4) पदाचे नाव ___________________________

5) जन्म दिनांक: __________________________________

6) वजन: ___________________ किलो उंची: ______________________ सें.मी.

7) वय:

8) शैक्षणिक अर्हता: ____________________________________________________________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रति

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक

# बृहन्मुंबई महानगरपालिका

लो.टी.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई 400022

दूरध्वनी क्रं. - 0224063081-89

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत:

____________________________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव:

____________________________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता):

____________________________________________________________

4) पत्ता ____________________________________________________________

____________________________________________________________

5) दूरध्वनी क्रमांक : ____________________________________________________________

6) इ – मेल आय डी : ____________________________________________________________

7) लिंग– पुरुष ________________ स्त्री ____________________

8) जन्मदिनांक: दिनांक__________ महिना__________ वर्ष ___________

दिनांक ____________________ रोजी असलेले वय __________ महिने ________ दिवस_____

9) शैक्षणिक अर्हता:

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी (Degree) | | | | | | | |
| पदविका (Diploma) | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |

10) अनुभव: ____________________________________________________________

11) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता: ____________________________________________________________

____________________________________________________________

12) उंची: ___ फूट __ इंच, वजन: ______ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ वर्ण: _________ नेत्र वर्ण: _________ वैयक्तिक खूण:____________

13) संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील: ______________________________________

______________________________________________________________

15) उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयिन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. होय / नाही

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही
(अर्जदाराचे नाव)

दिनांक: